# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - VI**

**Time : 3 Hours** **(Pages 10)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **2**




**कविता :** छान निरीक्षण आहे हं तुझं. बरं, मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का ?
**सुश्रुत :** हो, करतात ना.
**कविता :** कोणत्या तारखेला करतात ?
**सुश्रुत :** अंऽऽऽ, २७ फेब्रुवारीला.
**कविता :** अगदी बरोबर. तो कोणाचा जन्मदिवस आहे, माहीत आहे तुला ?
**सुश्रुत :** नाही ग.
**कविता :** 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे.
**सुश्रुत :** खरंच ?
**कविता :** कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत, बालकवी, बा. भ. बोरकर, बा. सी. मर्ढेकर, शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले. संतकाव्यापासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.
**नाटक :** होय सुश्रुत, ओळखलंस का मला ?
**सुश्रुत :** तू कोण आहेस रे ?
**नाटक :** माझ्याकडे बघ म्हणजे तुला कळेल.
**सुश्रुत :** अरे, नाटकदादा तूऽऽ
**नाटक :** पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान मी प्राप्त करतो. तुला माहीत आहे, माझं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो. वाचनीय अन् प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.
**सुश्रुत :** मी कालच एक धमाल बालनाट्य बघितलं. त्याचं दिग्दर्शन उत्तम होतं, असे बाबा म्हणाले.

**नाटक** : वाऽऽ छान ! अरे, दिग्दर्शकासाठी मला दिग्दर्शित करणे हा आनंददायी अनुभव असतो. मराठी भाषेत गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, राम गणेश गडकरी, पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर, प्र. के. अत्रे अशा दिग्गज लेखकांनी मला समर्थपणं हाताळलं.
**चरित्र** : ए, सुश्रुत, शुक् शुक् इकडे बघ.
**सुश्रुत** : कोण बोलवतंय मला ?
**चरित्र** : अरे मी ! मी चरित्र. मी एखाद्या थोर व्यक्तीमत्वाच्या व्यक्तिचा लेखकावर प्रभाव पडतो आणि त्याच्या आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते आणि त्यातून मी जन्माला येतो.
**सुश्रुत** : मॅडम नेहमी म्हणतात, की थोरांची चरित्रं सामान्यांना प्रेरणा देतात म्हणून.
**चरित्र** : अगदी बरोबर, कारण मी असतोच मुळी संघर्षमय, कर्तृत्ववान आणि संधीचे सुवर्णसंधीत रूपांतर करणारा. म्हणूनच सामान्य लोकांची मनं, मतं माझ्या सहवासात बदलतात. बाबासाहेब पुरंदरे, धनंजय गाडगीळ, भा. द. खेर, रणजीत देसाई अशी अनेक प्रसिद्ध लेखकांनी मला हाताळले.

(२) (i) **कारण शोधा.** **1**
नाटक मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करते कारण ...

(ii) **चूक की बरोबर लिहा.** **1**
थोरांची चरित्र सामान्यांना धोका देतात.

(३) **व्याकरण :**
(i) **खालील वाक्यातील काळ ओळखा.** **1**
अनेक प्रसिद्ध लेखकांनी मला हाताळले.

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** **1**
आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते <u>आणि</u> त्यातून मी जन्माला येतो.

(४) **स्वमत :** **2**
'नाटक कलाकाराला घडवते' याचे समर्थन करणारे विचार तुमच्या शब्दांत मांडा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**
(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**

(i) **नाल्याच्या पलीकडून आलेला आवाज** → [ ]

(ii) **पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज** → [ ]

''ऑऽव्हऽऽ'' अचानक नाल्याच्या पलीकडून आलेल्या या बारीक आवाजानं मी जागीच थबकलो. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. एका वर्षाच्या वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की हा वाघिणीचा आवाज आहे. ती या आवाजानं आपल्या पिल्लांना बोलवत असावी. अचानक पाण्यात 'धपकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. मी पाणवठ्याकडं पाहिलं आणि आश्चर्यानं थक्कच झालो. एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती. लगेच त्याच्या पाठोपाठ उरलेली तीनही पिल्लं धपाधप पाण्यात उतरली. आईचा आश्वासक आवाज त्यांच्याकरिता उत्साहाचं वारं भरणारा ठरला होता.

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ, बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच. त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो. त्यामुळं वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूंमधून मला वाघीण येताना दिसली. ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली. रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होतं. त्यातील एका पिल्लानं तर वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं-घेणं नव्हतं. त्यांचा आईच्याभोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

(२) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** **1**

वाघिणीने शिकारीला जाण्यापूर्वी पिल्लांना कोठे लपवले होते ?

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

.............. जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

(आईच्याभोवती, वाघिणीच्याभोवती, पिल्लांभोवती, लेखकांच्याभोवती)

(३) **व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** **2**

| क्र. | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | भक्षकांना | ........ | ........ |
| (ii) | वाघिणीचा | ........ | ........ |

(४) **स्वमत :** **2**

'भारताचा राष्ट्रीय पशू-वाघ' याबद्दल तुम्हांला असलेली माहिती तुमच्या शब्दांत मांडा.

## अपठित गद्य

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील कृती पूर्ण करा.** **2**

(i) यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे मनुष्यत्वाचे ध्येय आहे.

→ [ ] [ ]

(ii) सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य

→ [ ] [ ]

सगळी मनुष्यजात ही एक आहे आणि सगळ्या मनुष्यजातीचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्यत्वाचे ध्येय होय. परमेश्वराने सर्व मानवांना जन्मत:च धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य दिले आहे. सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेण्याचा सारखाच अधिकार आहे. शेतकी, कला-कौशल्य, मजुरी इत्यादी कामे मनुष्यास हीनपणा आणित नसून त्यांच्यायोगे मनुष्याची थोरवी सिद्ध होते. निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागविण्याकरता उपयोग करणे हा मनुष्याचा मूलभूत अधिकार व कर्तव्य होय. ईश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीत प्रयत्न केल्यास सर्व मनुष्यांस त्याचा स्वर्ग बनवता येईल. या विश्वात जगण्याकरता आणि उपभोगण्याकरता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळवणे हे मनुष्याचे पहिले कर्तव्य आहे. आणि त्याकरता परस्परांना साहाय्य करणे हा मनुष्याचा श्रेष्ठ धर्म आहे. एवढेच नव्हे तर ही ईश्वराची पूजा आहे.

**(२) उत्तरे लिहा.** **2**

(i) मनुष्यास मिळालेला समान अधिकार - [ ]

(ii) मनुष्याची थोरवी सिद्ध करणारी कामे - [ ]

**(३) व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** **2**

| शब्द | मूळ शब्द | प्रत्यय | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| परमेश्वराने | ............. | ने | ............. |
| मानवांना | मानव | ............. | ............. |

**(४) स्वमत :** **2**

आपल्याला मिळालेल्या हक्कांचा वापर आपण कसा करावा स्पष्ट करा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) कसं ते पूर्ण करा.** 1

| यावर आमुचा अधिकार आहे. |
|---|
| ↓ |
| |

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

फुलामुलांतून हसतो .......... मातीचे हो मंगल तनमन.

(चैत्र, वैशाख, श्रावण, माघ)

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार।।

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

**(२) काव्यपंक्तीचा योग्य क्रम लावा.** 2

(i) भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

(ii) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

(iii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।

(iv) शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।

**(३) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.** **2**

**(४) खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.** **2**
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।

**प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** **1**
कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते ?

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**
तुझ्या शौर्यगाथेपुढे, त्याची केवढीशी .....................

(मान, किंमत, शान, तान)

| | |
|---|---|
| नाही मुठीमध्ये द्रव्य<br>नाही शिरेमध्ये रक्त,<br>काय करावें कळेना<br>नाही कष्टाचे सामर्थ्य;<br>जीव ओवाळावा तरी<br>जीव किती हा लहान;<br>तुझ्या शौर्यगाथेपुढे<br>त्याची केवढीशी शान;<br>वर घोंघावे बंबारा,<br>पुढे कल्लोळ धुराचे, | धडाडत्या तोफांतून<br>तुझें पाऊल जिद्दीचें;<br>तुझी विजयाची दौड<br>डोळे भरून पहावी<br>डोळ्यांतील आसवांची<br>ज्योत ज्योत पाजळावी<br>अशा असंख्य ज्योतींची<br>तुझ्यामागून राखण;<br>दीनदुबळ्याचं असें<br>तुला एकच औक्षण. |

**(२) योग्य पर्याय निवडा.** **2**

(i) सैनिकाचे औक्षण कसे केले जाते .......
(अ) भरलेल्या डोळ्यांना (ब) डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी
(क) तबकातील निरांजनाने (ड) भाकरीच्या तुकड्याने

(ii) कवितेतील 'दीन दुबळे' म्हणजे .......
(अ) कष्टाचे, पैसे नसलेले. (ब) सैनिकांबरोबर लढणारे.
(इ) शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले. (ई) सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.

**(३) सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो, या विधानातील भाव स्पष्ट करा.** **2**

**(४) देशसेवा हीच ईश्वरसेवा असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकासाठी तुम्ही काय करू शकता ते लिहा.** **2**

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत धारण करून तपश्चर्या करत ...

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)

**व्युत्पत्ती कोश**
- → निर्मितीचा ठराव
- → निर्मितीची जबाबदारी
- → निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- → त्याचे प्रकाशन

(२) कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषिक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. त्यावरून शब्द तयार होतात ते लिहा.
तक्ता पूर्ण करा.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | --------------- | तोंड |
| कन्नड | तुप्प | --------------- |
| अरबी | --------------- | अत्तर |

(३) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस! या विधानाची यथार्थता लिहा.

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | पंधरवडा | --------------- | --------------- |
| (ii) | सुंठसाखर | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

**खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.**
संत म्हणति, ‘सप्त पदे सहवासे सख्य साधुशी घडते ?

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का? (आज्ञार्थी करा.)

२. मला तुमच्याशी मैत्री करायला खूप आवडेल (उद्‌गारार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** **2**

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. (दसरा) चा सण सर्वांना आनंद देतो.

२. एका (महिना) त सर्पदंशाने दोघांचा मृत्यू झाला.

(v) **वाक्प्रचार** **2**

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(किमया करणे, देहभान विसरणे, ब्रह्मानंद होणे)

१. पावसाळ्यातील इंद्रधनुष्याने माझ्या मनावर जादू केली.

२. श्रावण बाळाची गोष्ट ऐकताना मुले-मुली स्वत:ला विसरली.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** **1**

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. निकटवर्ती - ............ २. म्हातारा - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. हसणे × [ ] २. मृदू × [ ]

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** **1**

देवावर विश्वास असणारा - [ ]

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** **1**

[ ] ← दंड → [ ]

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** **1**

१. निरमिती, निर्मीती, निर्मीति, निर्मिती

२. कुलुप, कुलूप, कूलूप, कूलुप

(ii) **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** **1**

तिच्या डोळ्यांतला कोध्र त्याच्या परीचयाचा होता.

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून लिहा.** **2**

१. माझ्या आई! वडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले होते;

२. त्यांच्या ''विशाखा'' या काव्यसंग्रहाला मानाचा ''ज्ञानपीठ'' पुरस्कार मिळाला?

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **1**

१. Tax - २. Exhibition -

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** **1**

भुंगा, चिमणी, गरुड, फुलपाखरू

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** **5**

**खालील जाहिरात वाचा व संबंधितांस मागणी पत्र लिहा.**

**ज्ञानसागर ग्रंथ भांडार**
महात्मा गांधी रोड, दादर, (प.),
सर्व पुस्तकांवर योग्य सवलत
वेळ : स. १०.०० ते रा. ८.००
***सोमवार बंद.***

(२) **सारांश लेखन** **5**

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

श्रावणात अखेरीस येणारा 'नांगरी संस्कृती'तला सगळ्यांत मोठा सण म्हणजे पोळा. ज्या बैलांच्या श्रमांवर सारी कुणबीक चालते, त्या बैलाला सजवून त्याची पूजा करतात. मानेवर जू आल्यानंतर एक निबर घट्टा बैलाच्या खांद्यावर पडलेला असतो. बैलाचे खांदे या दिवशी मळले जातात. त्याला 'खांदेमळण' असे म्हटले जाते. शेतकऱ्याचे घर या सणाला दिवाळीइतकेच सजते. माणसे बैलांचा साजशिणगार करण्याच्या कामात गुंतलेली असताना घरातल्या बायकांची वेगळीच लगबग चाललेली असते. अख्खे कुटुंबच या कामात गुंतते. घराचा कोपरा न् कोपरा उजळला जातो. घर सारवून झाल्यानंतर भिंतीवर घराच्या दारापासून ते गोठ्यापर्यंत पाच बोटांनी चुन्याचे ठिपके मारले जातात. चुना आणि गेरू वापरून ही सजावट केली जाते.

घरातल्या बाया गेरूने गोठ्यात, देवळीच्या, दरवाजाच्या दोन्हीही बाजूला बाहुल्या काढतात. गुणाकाराच्या आकारासारख्या दोन रेषा परस्पर तिरप्या काढल्यानंतर बाहुलीला पाय, हात व डोके काढले जाते. अशी सारी सजावट करून घरदार लख्ख केले जाते. पोळ्याला पावसाची दिशा बदलते म्हणून 'पोळा अन् पाऊस झाला भोळा', असे म्हटले जाते.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) जाहिरात लेखन** **6**

**खालील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.**

शब्द: प्रवासी बॅग्ज, मजबूत, सुंदर रंग, ग्राहक समाधान

**(२) कथा लेखन** **6**

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा. दिलेली कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.**

रामपूर गावामध्ये सोहनलाल नावाचा एक सावकार राहत होता. तो अतिशय लोभी होता. सोन्याची तर त्याला विशेष आवड होती. एके दिवशी गावात एका साधूचे प्रवचन होते. प्रवचनात साधुमहाराजांनी सांगितले की, 'आपण जर मनापासून परमेश्वराची भक्ती केली तर परमेश्वर आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो.' सोहनलाल हे ऐकून खूपच खूश झाला. त्या दिवसापासूनच परमेश्वराची भक्ती करू लागला. दिवस रात्र अगदी मनापासून परमेश्वराच्या भक्तीत तो रंगून जाऊ लागला असे बरेच दिवस निघून गेले. ........

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते१२० शब्द)** **8**

**(१) फळ्याचे आत्मवृत्त ....**

१. प्राचीन रूप-काळाची गरज

२. प्राथमिक अवस्था - सेवाभावी वृत्तीमुळे समाधानी

३. वर्गात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांचा साक्षीदार



४. आधुनिकतेचा प्रभाव

५. परोपकारी वृत्तीमुळे जीवनात समाधानी

**(२) शाळा बंद झाल्या तर ...**

१. ही कल्पना कशी सुचली ?

२. तुम्ही कसे वागाल ?

३. फक्त खेळ मनोरंजन




४. कल्पनेचे दुष्परिणाम, प्रगती नाही.

५. सर्वत्र अज्ञानाचा अंधार, वाईट परिस्थिती

६. कल्पना भयंकर शेवट

**Best Of Luck**